<u>नियमीत दिवाणी मुकदमा क्र.२०४/२०२४ मधील नि. क्र. ५१ वरील आदेश</u>

०१. प्रस्तुत अर्ज वादींनी दिवाणी प्रक्रिया संहिता,१९०८ चे आदेश २२ नियम ३ व आदेश ६ नियम १७ प्रमाणे मयत वादी क्र. १ यांचे वारस अभिलेखात समाविष्ट करण्याकरीता दाखल केलेला आहे. मयत वादी क्र. १ चे वारस वादी क्र. १ड याने अर्जासोबत त्याचे शपथपत्र नि.क्र.५२ प्रमाणे दाखल केले आहे.

०२. प्रस्तुतचा दावा वादी यांनी प्रतिवादी यांचे विरुध्द दावा मिळकतीमधील विहीरीचे अतिक्रमण काढणेसाठी कृतित्मक ताकीद व निरंतर ताकीदीकरीता दाखल केला आहे. वादी असे कथन करतात की, प्रस्तुत दाव्याचे कामकाज चालू असताना यामधील वादी क्र. १ कांतीताल नथुराम मार्कळ हे दिनांक १२.१०.२०२५ रोजी निधन पावले आहेत. त्यांचे कायदेशीर वारस अभिलेखावर घेणे न्यायाचे व अंतिम निर्णयाचे दृष्टीने आवश्यक आहे. करीता, सदर दाव्याचे सरनाम्यात खालीप्रमाणे दुरुस्ती करणेत यावी.

०३. मयत वादी क्र. १ कांतीलाल नथुराम मार्कळ यांचे नावास कंस करण्यात येवून त्यापुढे '’मयत वारस’’ असे शब्द घालून खाली नमूद वारसांची नावे नमूद करणेत यावीत.

वादी कांतीलाल नथुराम मार्कळ मयत वारस,

१अ. सिंधु कांतीलाल मार्कळ, वय – ५५ वर्षे, धंदा – सुखवस्तु,

१ब. निलेश कांतीलाल मार्कळ, वय – ४१ वर्षे, धंदा – शेती,

१क. संध्या उमेश खुळे, वय – ३८ वर्षे, धंदा – घरकाम,
रा. बोधेवाडी, तालुका – कोरेगांव, जिल्हा – सातारा.

१ड. संग्राम कांतीलाल मार्कळ, वय – ३५ वर्षे, धंदा – शेती,
वादी क्र. १अ, १ब, १ड रा. नेर, तालुका – खटाव, जिल्हा – सातारा.

०४. अर्जदारांनी प्रस्तुतच्या अर्जासोबत वादीचा मृत्यूचा दाखला दाखल केला आहे. ते असे कथन करतात की, अर्जदार यांना मयत वादी क्र. १ यांचे कायदेशीर वारस म्हणून अभिलेखावर घेणे न्यायाचे दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. सदरहू दुरुस्तीने वादीचे दाव्याचे स्वरुपावार कोणताही फरक पडणार नाही. याउलट न्यायालयास न्यायनिवाडा करणे सुलभ होणार आहे. वादी क्र. १ चे कायदेशीर वारस अभिलेखावर घेणेबाबतचा अर्ज मुदतीत आहे. करीता अर्ज कलम ३ मध्ये नमूद केलेले वादीचे कायदेशीर वारस दाव्याचे सरनाम्यात समाविष्ट करण्यास परवानगी मिळावी, अशी अर्जदारांनी विनंती केली आहे.

०५. प्रतिवादी यांनी वादीने दाखल केलेल्या प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करुन आक्षेप नोंदवला आहे. प्रतिवादी असे कथन करतात की, अर्जदारांनी दाखल केलेल्या अर्जातील संपूर्ण मजकुर खोटा व लबाडीचा असून तो प्रतिवादी यांना मान्य व कबूल नाही. मयत वादी क्र. १ चे पश्चात त्यांचे वारसांना दावा चालविणेचा कोणताही कायदेशीर हक्क नाही, त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करणेत यावा, अशी प्रतिवादींनी विनंती केली आहे.

०६. वादी व प्रतिवादींचे विधिज्ञांचा यूक्तीवाद ऐकला.

०७. प्रस्तुत अर्जाचे व अभिलेखावर दाखल असलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. वादी यांनी नि.क्र. ५३/१ लगत दाखल केलेल्या मयत वादी क्र. १ कांतीलाल नथुराम मार्कळ यांच्या मृत्यू प्रमाणपत्राचे अवलोकन केले असता वादी क्र.१ हे दिनांक १२.१०.२०२५ रोजी मयत झाल्याचे दिसून येत आहे. माझ्या मते, प्रस्तुत प्रकरण गुणवत्तेवर निकाली काढणेसाठी मयत वादी क्र.१ चे वारसांना अभिलेखात वादीपणात सामील करणे आवश्यक आहे. वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज विहीत कालावधी संपणेपूर्वी दाखल केलेला आहे. नक्कीच मयत वादी क्र.१ चे वारसांना प्रस्तुत दाव्यात वादीपणात सामील न केल्यास, प्रकरण अंतिमतः निकाली काढणे शक्य ठरणार नाही. करिता, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करतो.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांनी मयत वादी क्र.१ चे वारसांना प्रस्तुत प्रकरणात १४ दिवसांच्या आत वादीपणात सामील करून घ्यावे.

३. वादींनी दावा दुरूस्त केल्याबाबतची प्रत मूळ दाव्याचे कामी तसेच प्रतिवादी यांना देणेची आहे.

SALIM PIRMAHAMAD SAYYAD

Digitally signed by SALIM PIRMAHAMAD SAYYAD
Date: 2026.01.09 14:59:29 +0530

दि.०८.०१.२०२६

(सलीम पी. सैय्यद )
२रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
वडूज.